**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यात नारी शक्तीची सर्वात मोठी भूमिका असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, लखपती दिदी योजनेच्या दहा लाख लाभार्थ्यांशी प्रधानमंत्र्यांचा संवाद

- जगभरासह देशात आज महिला दिन साजरा/हा दिवस महिलांच्या योगदानाचा दिवस असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे गौरवोद्गार

- रशियावर कठोर निर्बंध आणि शुल्क लादण्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**आणि**

- फिडे जागतिक ज्युनियर बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा ग्रँडमास्टर प्रणव वेंकटेशला विजेतेपद

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यात नारी शक्तीची सर्वात मोठी भूमिका असणार आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवसारीतल्या वंसी-बोरसी इथं प्रधानमंत्री मोदी लखपती दीदी संमेलनाला संबोधित करताना बोलत होते. या कार्यक्रमात एक लाख महिला उपस्थित होत्या.

नारी शक्तीने देशाच्या प्रगतीची कमान सांभाळली आहे. महिलांचा सन्मान ही समाज आणि देशाच्या विकासाची पहिली पायरी आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.
माझ्या आयुष्यात मला कोट्यवधी माता-भगिनींचा आशीर्वाद मिळाला, हे माझं भाग्य आहे. हे आशीर्वाद सर्वात मोठी प्रेरणा आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. लिज्जत पापड, अमूलसारख्या उद्योगातील महिलांच्या सहभागाचं त्यांनी कौतुक केलं. स्वयं

सहाय्यता गटाच्या सामर्थ्याला वाढवण्यासाठी सरकारने या योजनेंचा निधी पाचपटींनी वाढवला, असं त्यांनी सांगितलं.

२०१४ नंतर देशात सर्वाधिक महिला मंत्रीपदी विराजमान झाल्या. २०१९ मध्ये ७८ महिला खासदार निवडून आल्या. अंतराळ मोहिमा, कार्यक्रमांमध्ये महिलांनी मोठं योगदान दिलं आहे. आज जगातल्या सर्वाधिक महिला वैमानिक भारतात आहेत, याचा आपल्याला अभिमान आहे, असंही ते म्हणाले. जी-सफल आणि जी-मैत्री या दोन योजनांचा शुभारंभही त्यांनी यावेळी केला.

तत्पूर्वी प्रधानमंत्र्यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्तानं आज गुजरातमधल्या नवसारी जिल्ह्यात ‘लखपती दीदी’ योजनेच्या दहा लाभार्थींशीही संवाद साधला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या महिन्याच्या 11 आणि 12 तारखेला मॉरिशस दौऱ्यावर जाणार आहेत. मॉरिशसच्या राष्ट्रीय दिवसाच्या समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. भारतीय संरक्षण दलाची तुकडीही यात सहभागी होणार आहे. या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी मॉरिशसचे राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांची भेट घेतील. तसंच उच्चपदस्थ अधिकाऱ्यांशीही चर्चा करतील. प्रधानमंत्री या दौऱ्यात भारतीय समुदायाशी संवाद साधतील तसंच सिव्हिल सर्विस कॉलेज आणि एरिया हेल्थ सेंटरचं उद्घाटन करतील.

**<><><><><>**

जागतिक महिला दिन आज सर्वत्र साजरा केला जात आहे. सर्व महिला आणि मुलींसाठी अधिकार, समान हक्क आणि सबलीकरण ही यंदाच्या महिला दिनाची संकल्पना आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस महिलांचं योगदान आणि कर्तबगारीचा गौरव करण्याचा असून महिलांच्या

विकासाच्या प्रवासात सर्व देशवासीयांनी त्यांना साथ द्यावी, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे.

विकसित भारतासाठी महिलांच्या नेतृत्वाखालील विकास महत्वपूर्ण असल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. तर महिला सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारनं अनेक योजना आणि धोरणं आखली आहेत, देशभरातल्या महिलांना आपण नमन करत आहोत असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

महिला दिनाच्या निमित्तानं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नारी शक्ती से विकसित भारत या एक दिवसीय संमेलनाचं उदघाटन झालं. महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी महिला दिन साजरा केला जातो, या दिनाचं औचित्य साधून सर्वांनी लिंगभाव समानतेत सुधारणा घडवून आणण्याचा संकल्प करूया असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकार विविध योजना राबवत असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या….

**होल्ड बाईट राष्ट्रपती**

केंद्रीय महिला आणि बाल कल्याणमंत्री अन्नपूर्णा देवी या संमेलनात सहभागी झाल्या आहेत. या परिषदेनंतर उच्चस्तरीय पॅनेल चर्चा आणि तीन तांत्रिक सत्रं होणार आहेत.

**<><><><><>**

महिला दिनानिमित्त विविध राज्यांमध्ये अनेक कार्यक्रम आयोजित केले आहेत, तसंच महिलांच्या योगदानाचा गौरव केला जात आहे. बिहार मध्ये विविध क्षेत्रं, सरकारी पदं, पोलीस आस्थापना, पंचायत राज संस्था आणि इतर ठिकाणी महिला शक्तीचं वर्चस्व दिसून येत आहे. बिहार मध्ये पोलीस दलात ३० टक्के महिला कार्यरत असून सर्व राज्यांमध्ये हे प्रमाण सर्वाधिक आहे.

तेलंगणा मध्ये आज ‘इंदिरा महिला शक्ती अभियाना’ चा आरंभ केला जाणार आहे. या माध्यमातून महिला बचत गटांची कामगिरी आणि महिला सक्षमीकरणासाठी भविष्यातल्या योजनांचं एकत्रीकरण केलं जाणार आहे.

महाराष्ट्रातही महिला दिनानिमित्त विविध ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

आकाशवाणीचा वृत्तविभाग जागतिक महिला दिन अनोख्या रीतीनं साजरा करणार आहे. आज प्रसारित होणारी सर्व हिंदी आणि इंग्रजी बातमीपत्र महिला वृत्तनिवेदकच सादर करणार आहेत. याला काल मध्यरात्रीपासूनच सुरुवात झाली. वृत्त विभागाचा आजचा दिवसभराचा कारभारही महिला कर्मचारी वर्गच सांभाळणार असून महिला दिनानिमित्त आज रात्री एका विशेष चर्चासत्राचं प्रसारण केलं जाणार आहे.

<><><><><>

युक्रेनसोबत शांतता करार होत नाही तोपर्यंत रशियावर कठोर निर्बंध आणि शुल्क लादण्यात येईल असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. रशिया युक्रेनवर दडपशाही करत असल्यानं हा निर्णय घेतल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं.

ट्रम्प हे मागच्या काही दिवसात रशियाची बाजू घेत होते. त्यामुळे त्यांच्या या वक्तव्यावर आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.

<><><><><>

मॉन्टेनेग्रो इथं काल झालेल्या फिडे जागतिक ज्युनियर बुद्धिबळ स्पर्धा २०२५ मध्ये १८ वर्षीय भारतीय ग्रँडमास्टर प्रणव वेंकटेशनं विजेतेपद पटकावलं. विश्वनाथन आनंद, पेंटाला हरिकृष्ण आणि अभिजीत गुप्ता यांच्यानंतर प्रणव हा जागतिक ज्युनियर अजिंक्यपद जिंकणारा चौथा भारतीय ठरला. दरम्यान चेक

प्रजासत्ताक इथं झालेल्या प्रतिष्ठित प्राग बुद्धीबळ स्पर्धेत भारताच्या अरविंद चिथंबरमनं सुवर्ण पदक जिंकलं. या विजयासह अरविंदचा समावेश जागतिक क्रमवारीत पहिल्या पंधरा खेळाडुंमध्ये झाला आहे.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट मध्ये काल लखनौ इथं झालेल्या सामन्यात गुजरात जायंटस संघानं दिल्ली कॅपिटल्स संघाचा ५ गडी राखून पराभव केला. दिल्ली कॅपिटल्सनं दिलेल्या १७८ धावांचं आव्हान गुजरात जायंटसनं ३ चेंडू शिल्लक असताना पूर्ण केलं. या विजयामुळे गुजरात जायंट्स संघ ७ सामन्यांतून ८ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. तर दिल्ली कॅपिटल्सच्या खात्यात ८ सामन्यातून मिळालेले १० गुण आहेत. या स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि यूपी वॉरियर्स यांच्यात सामना होणार आहे .

**<><><><><>**

मुंबई इथं आयोजित केल्या जाणाऱ्या वेव्हज् या जागतिक दृक श्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदेच्या तयारीचा केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी काल मुंबईत आढावा घेतला. भारताच्या आध्यात्मिक वारशाला चालना देणं, देशाला जागतिक सामग्री केंद्र आणि निर्यातदार म्हणून स्थान देणं, बौद्धिक संपदा परिसंस्थेला चालना देणं, आदी गोष्टींना चालना देण्यासाठी या परिषदेचं आयोजन केलं जाणार असल्याचं त्यांनी माध्यमांना सांगितलं. तसंच भारतीय माध्यमांची जागतिक उपस्थिती वाढवणं आणि मोठ्या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करणं, यावर देखील या परिषदेत भर दिला जणार असल्याचं जाजू म्हणाले.

**<><><><><>**

जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद म्हणजे वेव्हज मध्ये क्रिएट इन इंडिया चॅलेंज अंतर्गत  ट्रुथ टेल  हॅकेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. याचा  उद्देश, थेट प्रक्षेपणामध्ये दिल्या जाणाऱ्या चुकीच्या माहितीच्या समस्येवर मात करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपाय विकसित करणं असा आहे.

<><><><><>

गेल्या वर्षभरात अंदाजे २२५ कोटी आधार प्रमाणीकरणावर आधारित व्यवहार करण्यात आल्याची माहिती केंद्र सरकारनं आज दिली. इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयानं जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे की, या वर्षी १४ टक्के वाढी सह गेल्या महिन्यात सुमारे ४३ कोटी ई-केवायसी व्यवहार करण्यात आले. तसंच गेल्या महिन्यात सुमारे १३ कोटी आधार फेस प्रमाणीकरण व्यवहार करण्यात आले. त्यामुळे बँकिंग, वित्त आणि इतर क्षेत्रांमध्ये प्रक्रिया अधिक सुरळीत, सुरक्षित आणि कार्यक्षम बनल्या आहेत.

<><><><><>

उत्तर आयर्लंड मध्ये स्थापन झालेल्या भारतीय दूतावासामुळे दोन्ही देशांमधले व्यापार, तंत्रज्ञान, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातले संबंध वृद्धिंगत होतील, असा विश्वास परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांनी व्यक्त केला आहे. जयशंकर यांच्या हस्ते काल बेलफास्ट इथल्या भारतीय दूतावासाचं उदघाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. जयशंकर यांनी या दौऱ्यात आयर्लंडच्या मंत्र्यांचीही भेट घेतली.

//<><><><><>//